Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index


1. RegionalismA Major Issue in India — 9
   Dr. Vilas Aghav
2. Different views of Corruption in Indian Politics — 12
   Dr.ArunPentawar
3. Gender Discrimination — 14
   Dr. Kalpana Manikrao Kadam
4. Problems Faced by Working Women At Workplace in India — 17
   Dr.NasreenB.L. Shaikh
5. A Casteism in Indian Politics — 19
   Dr. Akash S. Bangar
6. Dr. B. R. Ambedkar's Idea and Reflections on Nationalism — 22
   Dr. Kishor N. Ingole
7. Political leader's characteristics, mental process and behavior -A psychological imperial study. — 27
   Dr.ShekarSubhash Tulshiram
8. व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार आणि प्रसारमाध्यमे — 31
   डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे
9. लोकशाही उदय व विकासाचा ऐतिहासिक अभ्यास — 33
   डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर
10. लोकशाही: अर्थ आणि लोकशाहीसाठी आवश्यक अटी — 36
    प्रा. डॉ.कऱ्हाळे उत्तम सिताराम
11. भारतीय लोकशाहीसमोरील समकालीन समस्या ('धूळपावलं' या कादंबरीच्या आधारे ) — 39
    डॉ. विष्णू नामदेव लांडे
12. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने — 43
    प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे
13. लोकशाहीत प्रसार माध्यमाची भूमिका — 46
    डॉ.डी.एस.पटवारी
14. लोकशाही : अर्थ आणि लोकशाहीसाठी आवश्यक अटी — 49
    प्रा.डॉ. कऱ्हाळे विलास लिबांजी
15. शाश्वत विकास व पर्यावरण व्यवस्थापन — 51
    स्वप्निल बालाजी पाटील


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 60 , Vol. 1<br>Oct. 2022 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# लोकशाही उदय व विकासाचा ऐतिहासिक अभ्यास

डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

गोषवारा

*लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून-अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म प्रसृत झाले, त्यांपैकी लोकशाही ही एक आहे म्हणून समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे अर्थपूर्ण ठरते. समाज व संस्कृती यांचे वळण जर लोकशाहीपर नसेल, तर लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारूनही त्या देशात लोकशाही रूजणे व टिकणे अवघड जाते. याउलट, एखाद्या देशात लोकशाही पद्धतीने दीर्घकाळ राज्यकारभार चालू असता, त्या देशातील समाजाला व संस्कृतीला लोकशाही वळण प्राप्त होते. अशा प्रकारे या दोन्हींमधील परस्परसंबंध स्पष्ट करता येतो.*

संज्ञा : *लोकशाही, गणराज्ये, नागरी स्वातंत्र्ये , मूलभूत हक्क*

लोकशाही हा डिमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द. त्याची इंग्रजी व्युत्पत्तिकोशात डिमॉस (Demos) + क्रसी (Cracy) अशी फोड केली असून त्यांचा अनुक्रमे 'सामान्य लोक' व 'सत्ता' असा अर्थ दिला आहे. हा शब्द डिमॉस + क्रॅटोस (Demos + Kratos) या ग्रीक शब्दापासून झालेला असून त्याचे लॅटिन रूप डिमॉक्रॅशिया असे आढळते. या संज्ञेचा स्पष्ट अर्थ आणि संकल्पनेची काटेकोर व्याख्या, हे अद्यापि विद्वानांत विवाद्य विषय आहेत. अनेक आधुनिक विचारवंतांनी 'लोकशाही' या संकल्पनेची व्याख्या व फोड केलेली आहे. त्यापैकी अब्राहम लिंकन यांची 'लोकांचेच, लोकांनी केलेले, लोकांसाठी राज्य' ही व्याख्या लोकप्रिय व सुप्रसिद्ध आहे. लिंकन या संदर्भात पुढे म्हणतात, 'मला गुलाम म्हणून जसे जगण्यास आवडणार नाही, तद्वतच मालक म्हणून राहण्यास आवडणार नाही. माझ्या या उद्‌गारातूनच लोकशाहीची कल्पना व्यक्त होते.' 'बहुमतांचे राज्य' असेही लोकशाहीचे वर्णन केले जाते. लोकशाहीचे साक्षात (प्रत्यक्ष) आणि प्रातिनिधिक (अप्रत्यक्ष) लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यतः मानले जातात. आधुनिक काळात 'लोकशाही' हा शब्दप्रयोग सामान्यपणे प्रातिनिधिक लोकशाही या अर्थानेच केला जातो तथापि स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोव देशांतून आजही साक्षात लोकशाहीचा प्रयोग काही प्रमाणात पाहावयास मिळतो. स्वित्झर्लंडमध्ये एकूण तीन हजार कम्यून असून सव्वीस कॅन्टन (घटक प्रदेश) आहेत. त्यांपैकी पाच कॅन्टनमध्ये वर्षातून काही दिवस सर्व नागरिक एकत्र जमतात. यावेळी सर्वच विधेयके चर्चेसाठी जनतेपुढे ठेवण्यात येतात आणि बहुमताने निर्णय घेतात. याशिवाय जनमतपृच्छा आणि उपक्रमाधिकार या प्रकारांनी प्रत्यक्ष लोकशाहीची उपयोजना इतर कॅन्टनमध्ये करण्यात आली आहे. ही पद्धत ऑस्ट्रेलियाच्या संविधानातही नमूद केलेली आहे परंतु तिचा प्रमुख्याने उपयोग संविधान दुरूस्तीच्या संदर्भातच करण्यात येतो.

उद्देश

1. लोकशाही उदय व विकासाबदल जाणून घेणे.
2. लोकशाहीच्या विकासाची प्रदीर्घ परंपरा अभ्यासणे.

गृहीतक

1. लोकशाही उदय ग्रीसमधील नगरराज्यांत, विशेषतः अथेन्समध्ये झाला.
2. विद्यमान इंग्लंडमधील लोकशाही ही प्रदीर्घ परंपरेतून विकसित झालेली आहे.

**लोकशाही उदय व विकास :**

प्राचीन ग्रीसमधील नगरराज्यांत, विशेषतः अथेन्समध्ये, इ.स.पू. पाचव्या शतकात लोकशाहीस पूरक असे प्रयोग झाले. मर्यादित लोकसंख्येमुळे साक्षात (प्रत्यक्ष) लोकशाही प्रयोग तत्कालीन काही नगरराज्यांत शक्य झाला. अथेन्समधील लोकशाहीमध्ये लोकशाही राज्यपद्धतीची बीजे आढळतात. ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. रोमनांनी लोकशाही तत्त्वांचा नेहमी आदर केलेला आढळतो.[1] अंतर्गत सत्तास्पर्धा आणि बाह्य आक्रमणे यांमुळे ग्रीक नगरराज्ये आणि रोमन प्रजासत्ताक कालांतराने अस्तंगत पावली आणि त्यांच्या जागी साम्राज्ये स्थापन झाली.

प्राचीन ग्रीस व रोमप्रमाणे भारतातही काही प्रदेशांत साक्षात लोकशाहीचा प्रयोग झाला होता. वेदोत्तर काळापासून गुप्तकाळापर्यंत राजाविरहित गणराज्ये होती. त्यांचे उल्लेख जैन, बौद्ध साहित्यातून तसेच महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र, ऐतरेय ब्राह्मण आणि ग्रीक लेखकांच्या वृतांतून मिळतात. गणराज्यांच्या काही मुद्राही मिळाल्या आहेत. यांतील बहुतेक गणराज्ये बिहार, सिंधू नदीचे खोरे आणि वायव्य प्रांत या भागांत होती.[२] यांत प्रदेशपरत्वे आणि कालानुसार सभेच्या कामकाजाच्या भिन्न पद्धती आढळतात. या व्यवस्थेत चातुर्वर्ण्य, त्यातील क्षत्रियांचे व काही क्षत्रिय कुलांचे श्रेष्ठत्व व वर्चस्व, त्यांच्या स्वतःच्या वंशाबद्दलचा अहंकार या लोकशाहीस बाधक गोष्टी तत्कालीन गणराज्यव्यवस्थेत होत्या. व्यक्तीस्वातंत्र्य आणि मूलभूत समानतेची कल्पना यांनाही त्यात स्थान नव्हते.

रोमच्या अधःपतनानंतर (इ.स.४७६)एक हजार वर्षे लोकशाही ही संकल्पनाच जवळजवळ लुप्त झाली होती. पुढे प्रबोधनकाल (इ.स.चौदावे-सोळावे शतक) आणि धर्मसुधारणा आंदोलन (इ. स. सोळावे-सतरावे शतक) या काळात तिचे पुनरूज्जीवन झाले धर्म, तत्त्वज्ञान व राजकारण यांबाबतीत लोक अधिक साहसी बनले. राजाच्या ईश्वरदत्त अधिकारांच्या कल्पनेला आव्हान देण्यात आले मार्टिन



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

ल्यूथरने १५१७ मध्ये आपले पंचाण्णव सिद्धांत जाहीर करून कॅथलिक चर्चविरोधी आंदोलनास प्रारंभ केला.[३] धर्मसुधारणा आंदोलनाचे यूरोपचे धार्मिक, वैचारिक आणि राजकीय जीवन ढवळून काढले. व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य प्रथमतः धार्मिक जीवनात व नंतर जीवनाच्या सर्व अंगांत हळूहळू दृढमूल होऊन परिणामतः यूरोपीय संस्कृतीत समता, व्यक्तीस्वातंत्र्य आणि ऐहिक जीवनाची स्वायत्तता ही आधुनिक मूल्ये रूजली आणि त्यांना अनुसरून राजकीय जीवनाची क्रांतिकारक पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. या काळातील मानवी संस्कृतीला लाभलेल्या व्यक्तिस्वातंत्र्य आणि ऐहिक स्वायत्तता या सर्वांत महत्त्वाच्या देणग्या होत.

इंग्लंडमध्ये तेराव्या शतकात जॉन राजाला मॅग्ना कार्टाला संमती देणे भाग पडले (१५ जून १२१५). इंग्लंडच्या घटनात्मक इतिहासात ह्या सनदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे कारण तिच्यातील महत्त्वाची कलमे मूलभूत हक्कांविषयीची आहेत. त्यामुळेच मॅग्नात कार्टास इंग्रजी राज्यघटनेचे *बायबल* म्हणतात. पहिला चार्ल्स (१६२५–४९) याच्या वेळी पार्लमेंटने आपल्या हक्कांचा एक मसुदा (पिटिशन ऑफ राइट्स) संमत करू घेऊन राज्याच्या स्वैर वर्तनावर निर्बंध लादले. रक्तहीन क्रांतीनंतर संमत झालेल्या बिल ऑफ राइट्सने (१६८६) घटनात्मक कायदा करून स्ट्यूअर्ट राजे आणि इंग्लिश संसद यांतील प्रदीर्घ संघर्षावर पडदा पडला. इंग्लंडमध्ये राजाने संसदेच्या संमतीने कारभार करावा, हे तत्त्व पुढील काळात रूढ होत गेले. संसदेचे राजकीय वर्चस्व हळूहळू वाढू लागले व नागरिकांनाही काही राजकीय हक्क प्राप्त झाले. बिल ऑफ राइट्स आणि ॲक्ट ऑफ सेटलमेंटमुळे (१७०१) संसदेच्या लोकशाहीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन *कॅबिनेट पद्धती* (मंत्रिमंडळ) अस्तित्वात आली व पक्ष पद्धतीचा पाया घातला गेला. अनियंत्रित राजेशाहीचे परिवर्तन मर्यादित राजेशाहीत झाले व संसदीय शासनपद्धती विकास पावली.[4] एकोणिसाव्या शतकात मताधिकाराचा विस्तार होत गेला. राजकीय घटना व पक्ष उदयाला आले. विद्यमान इंग्लंडमधील लोकशाही ही प्रदीर्घ परंपरेतून विकसित झालेली आहे.

इंग्लंडमधील लोकशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेबरोबरच अन्यत्रही लोकशाहीचा प्रसार झाला. इंग्लंडच्या आधिपत्याखालील अमेरिकी वसाहतींनी सशस्त्र लढा (१७७५–८३) देऊन स्वातंत्र्य मिळविल्यानंतर मर्यादित शासन व निसर्गसिद्ध हक्कांची कल्पना आधारभूत मानणारे लिखित संविधान संमत करून (१७ सप्टेंबर १७८७) मानवी हक्क, समानता इ. लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार केला. अमेरिकेच्या यशामुळे इंग्लंडला आपल्या वसाहतविषयक धोरणात आमूलाग्र बदल करावा लागला. यामधून पुढे ब्रिटिश राष्ट्रकुलाचा जन्म झाला. आणि जागतिक राजकारणात लोकशाही विचारप्रवाह वाढू लागले. त्याची परिणती फ्रान्सच्या राज्यक्रांतीत झाला. यानंतर लोकशाही विचारप्रवाह कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड[5] या देशांच्या स्वयंशासित लोकशाही पद्धतीत पुढे पहावयास मिळते.

यूरोपात लोकशाहीचा आविष्कार राजेशाहीविरोधी लढ्यांमधून झाला. फ्रान्स्वा व्हॉल्तेअर, माँतेस्क्यू, , रूसो इ. फ्रान्समधील लेखक-विचारवंतांनी फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. फ्रान्समधील सामाजिक अर्थव्यवस्थेवर व विशेषतः, तत्कालीन धर्मसंस्थांवर, त्यांनी हल्ला केला. सरदार व पुरोहित यांचे वर्चस्व आणि विशेष अधिकार नष्ट करणे, राज्यकारभार सुधारणे, वर्गनिरपेक्षपणे सर्वांस राजकीय, आर्थिक व धार्मिक स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे, या त्यांच्या मुख्य मागण्या होत्या. या विचारवंतांनी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वत्रयीचा हिरिरीने पुरस्कार केला. ही तत्त्वत्रयी क्रांतिकारक सुधारणांची प्रेरणा होती. फ्रेंच क्रांतिकारकांनी स्वीकृत केलेली मानवी हक्कांची सूची आणि निरनिराळया देशांच्या संविधानांत पुढे ग्रथित झालेले नागरिकांचे मूलभूत हक्क, यांचा मूलाधार अमेरिकेचा स्वातंत्र्य जाहीरनामाच आहे.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकांतील संघर्ष मुख्यतः राजाच्या ईश्वरदत्त अधिकारांविरूद्ध लोकांचा सार्वभौम अधिकार या कल्पनेत होता. पहिल्या महायुद्धात बऱ्याच राजेशाही देशांचा पराभव झाला व लोकशाही देशांची सरशी झाली. परिणामतः अनेक पाश्चात्य देशांत राजेशाहीचे समूळ उच्चाटन झाले आणि तिची जागा लोकसत्ताक वा साम्यवादी राज्यपद्धतीने घेतली (उदा., जर्मनी, तुर्कस्तान, रशिया इ.) कालांतराने विसाव्या शतकात आफ्रिका आशिया खंडांतील वासाहतिक देश स्वतंत्र होऊ लागले. वसाहतवादविरोधी चळवळीतून तेथील लोकशाही प्रेरणांचा आविष्कार झाला. स्वातंत्र्यानंतर मात्र खरी सत्ता लोकांच्या नावावर काही हुकूमशहांनी बळकाविली. वासाहतिक पारतंत्र्यातून मुक्त झालेल्या बहुतेक सर्व नवोदित देशांनी तत्त्वतः लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला असला आणि संविधानात लोकशाही वा प्रजासत्ताक या शब्दाचा निर्देश केला, तरी प्रत्यक्षात तेथे लोकशाहीला परिपक्व वातावरण नसल्यामुळे बहुसंख्य देशांत लष्करी राजवटी किंवा सर्वंकष शासनपद्धती वा साम्यवादी राजवटी अस्तित्वात आल्या. ज्या नवस्वतंत्र देशांमध्ये लोकशाही पद्धती टिकली, तेथेही विषमता, विविधता, राष्ट्रीय ऐक्याचे प्रश्न, आर्थिक विवंचना, अस्थैर्य इ. कारणांमुळे लोकशाहीच्या विकासावर अनेक मर्यादा पडलेल्या दिसतात.

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. लोकशाही मूल्यांवर श्रद्धा व दुसऱ्याच्या मतांविषयीचा आदर, हा लोकशाहीचा गाभा आहे. आपल्या विचारांच्या विरूद्ध असलेल्या मतांविषयी केवळ सहिष्णुताच न दाखविता त्या विचारांचा मान राखला जातो. यावर भारताच्या लोकशाहीची यशस्विता अवलंबून आहे. वैचारिक संघर्ष सहजतेने स्वीकारणे, हीच भारतीय लोकशाहीची खरी शक्ती आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सुरूवातीची पंचवीस वर्षे एकाच पक्षाचा साचेबंदपणा, अशिक्षित मतदार आणि बहुपक्षीयांचे अस्थैर्य यांवर भारतीय लोकशाही हिंदोळे घेत होती. आता निवडणूक पद्धतीतही काही सुधारणा होऊ घातल्या आहेत. गोस्वामी समितीने सुचविलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने काही शिफारशींचा विचार झाला, तर पुढील निवडणुकांत लोकशाहीची प्रक्रिया अधिक विशुद्ध स्वरूपात पाहावयास मिळेल,

**निष्कर्ष**

1. अथेन्समधील लोकशाहीमध्ये लोकशाही राज्यपद्धतीची बीजे आढळतात.
2. ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

3. प्राचीन ग्रीस व रोमप्रमाणे भारतातही काही प्रदेशांत साक्षात लोकशाहीचा प्रयोग झाला होता. वेदोत्तर काळापासून गुप्तकाळापर्यंत राजाविरहित गणराज्ये होती.
4. इंग्लंडमधील लोकशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेबरोबरच अन्यत्रही लोकशाहीचा प्रसार झाला.
5. वसाहतवादविरोधी चळवळीतून तेथील लोकशाही प्रेरणांचा आविष्कार झाला.

सारांश

लोकशाही संकल्पना प्रथम पश्चिम यूरोपात विकसित झाली, ग्रेट ब्रिटन, अमेरिका, तसेच नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इ. स्कँडिनेव्हियन देश, फ्रान्स, पश्चिम जर्मनी (संयुक्त जर्मनी) ही यूरोपातील लोकशाहीची काही ठळक उदाहरणे होत. पाश्चात्य लोकशाही संकल्पनेत नागरी स्वातंत्र्ये आणि मूलभूत हक्क यांवर कोणतेही निर्बंध नाहीत. लोक हेच आपल्या हिताचा विचार करणारे उत्तम परीक्षक असतात म्हणून त्यांना त्यांचे विचार मोकळेपणाने (खुलेपणाने) मांडण्याचा अधिकार व स्वातंत्र्य दिले पाहिजे , हा विचार प्रसृत झाला आहे. अमेरिका-ग्रेट ब्रिटन या देशांतील प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीचा आदर्श बहुतेक सर्व विकसनशील देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्यापुढे ठेवलेला दिसतो. त्या दृष्टीने जपान, भारत, श्रीलंका, बांगला देश, पाकिस्तान वगैरे देशांतून लोकशाहीचा कमी-अधिक प्रमाणात प्रयोग चालू आहे. इतर बहुसंख्य आशियाई व आफ्रिकी देशांमध्ये एकपक्षीय राजवटी अथवा हुकूमशाही शासनपद्धती आढळतात तथापि यांतील काही देशांमध्ये लोकशाहीवादी चळवळी मूळ धरीत आहेत आणि तेथे लोकशाहीच्या दिशेने प्रवास चालू आहे. फिलिपीन्स, म्यानमार (ब्रह्मदेश), नेपाळ, झँबिया ही याची काही ठळक उदाहरणे होत. भारतातील लोकशाही शासनपद्धती ही जगातील लोकसंख्येने सर्वांत मोठी असलेली लोकशाही आहे. लोकशाही मूल्यांवर श्रद्धा व दुसऱ्याच्या मतांविषयीचा आदर, हा लोकशाहीचा गाभा येथे आढळतो. आपल्या विचारांच्या विरूद्ध असलेल्या मतांविषयी केवळ सहिष्णुताच न दाखविता त्या विचारांचा मान राखला जातो, यावर भारताच्या लोकशाहीची यशस्विता अवलंबून आहे. वैचारिक संघर्ष सहजतेने स्वीकारणे, हीच भारतीय लोकशाहीची खरी शक्ती आहे.

संदर्भ सुची

1. Altekar, A. S. (1958), *State and Government in Ancient India*, Delhi,.७८
2. देवळाणकर शैलेंद्र, राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना,'पुणे, विद्या बुक्स पब्लिशर्स;१५
3. भोळे भा.ल.,भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे □ड कं. पब्लिशर्स पुणे.
4. देवळाणकर शैलेंद्र, राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना, पुणे, विद्या बुक्स पब्लिशर्स;१५
5. Barry, B. M. (1978) *Sociologists, Economists and Democracy*, Chicago,.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Peer Reviewed

ISSN 2319-8648

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in